ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

# वारकरी संप्रदाय एक अविरत भक्तीप्रवाह

**योगेश अर्जुन सुरळकर**
संशोधक विद्यार्थी

**डॉ.जयश्री टी. महाजन**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
मु.जे. महाविद्यालय, जळगाव

**सारांश : -**

*वारकरी संप्रदायाचा प्रवाह हा अविरत पणे गेली ९०० वर्ष वाहत आहेत. या संप्रदायाच्या परंपरा आणि तत्वे आज देखिल तेवढ्याच भक्ति भावाने पाळल्या जातात. त्याच बरोबर वारकरी संप्रदायाची व्यापकता एवढी आहे कि वारकरी सांप्रदायिक संतांच्या ओव्या इतर धर्मानी देखील त्यांच्या धार्मिक ग्रंथात सामील केलेल्या आढळतात. मराठी माणसाच्या मनात जितका आदर या वारकरी संप्रदायाबद्दल असेल कदाचितच दुसऱ्या कोणत्या संप्रदायाबद्दल असेल. त्याचे कारण म्हणजे या संप्रदायाची शिकवण, समाजपोषक वागणूक, असामाजिक तत्वांचा त्याग व त्याच बरोबर राष्ट्रीय एकात्मता व विश्वशांतीसाठी असणारी प्रयत्नशीलता. या सर्व कारणांमुळे आजही अगदी साधारण शेतकरी मनुष्यापासून ते थेट महाविद्यालयातील प्राचार्य किंवा न्यायाधीशांसारख्या शिक्षित मंडळीना सुद्धा या संप्रदायाने मोहात टाकलेले दिसते.*

**महत्वपुर्ण शब्द : -** *संप्रदाय, आध्यात्मिक, समन्वय, तात्विक बैठक*

cc BY

*Aarhat Publication & Aarhat Journals* is licensed Based on a work at *http://www.aarhat.com/amierj/*

**प्रस्तावना:**

अखंड भारताच्या आध्यात्मिक विश्वामध्ये अनंत धर्म व संप्रदाय आपआपले मतप्रवाह, रूढी, परंपरा व सिद्धांतांना घेवून या आध्यात्मिक विश्वाच्य मौलिक सौंदर्यात भर टाकत असतात. त्यातील बरेच धर्म व संप्रदाय हे एकमेकांन्न पूरक आहेत तर काही अगदी विरुद्ध आहेत, काहींमध्ये थोडे साम्य आहे तर काहींमध्ये थोडा भेद. तरीही प्रत्येक समुदाय आपले अस्तीत्व टिकवून आपली स्वतःची अशी वेगळी ओळख जगाला पटवून देण्याच्या प्रयत्नात दिसते. प्रत्येक संप्रदायाची आपली काही विशिष्ट मुल्ये आहेत, ज्या मूल्यांमुळे तो संप्रदाय इतरांपेक्षा वेगळा वाटतो. संप्रदाय किंवा धर्म कोणताही असो परंतु सर्वांचे ध्येय मात्र एकच आहे ते म्हणजे परमात्म्याची प्राप्ती, सत्याचा शोध किंवा ज्याला काही संप्रदाय मुक्ती म्हणत असतील किंवा मोक्ष. या मार्गामध्ये असणारा भेद संप्रदायांमध्ये मतभेद निर्माण करत असतो.

परमात्म्यप्राप्ती किंवा मोक्ष प्राप्तीचा केवळ आमचाच मार्ग खरा असे, जरी प्रत्येक संप्रदाय बजावून वारकरी संप्रदायाची

ISSN–2278-5655
AMIERJ
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

व्यापकता एवढी आहे कि वारकरी सांप्रदायिक संतांच्या ओव्या इतर धर्मानी देखील त्यांच्या धार्मिक ग्रंथात सामील केलेल्या आढळतात. मराठी माणसाच्या मनात जितका आदर या वारकरी संप्रदायाबद्दल असेल कदाचित दुसऱ्या कोणत्या संप्रदायाबद्दल नसेल. त्याचे कारण म्हणजे या संप्रदायाची शिकवण, समाजपोषक वागणूक, असामाजिक तत्वांचा त्याग व त्याच बरोबर राष्ट्रीय एकात्मता व विश्वशांतीसाठी असणारी प्रयत्नशीलता. या सर्व कारणांमुळे आजही अगदी साधारण शेतकरी मनुष्यापासून ते थेट महाविद्यालयातील प्राचार्य किंवा न्यायाधीशांसारख्या प्रशिक्षित मंडळीना सुद्धा या संप्रदायाने अगदी वेड लावलेले दिसते.

सांगत असला तरी कोणत्याही एका संप्रदायाचा संपूर्ण जगाने अंगीकार केलेला दिसत नाही ? संप्रदायांच्या शिकवणी सुद्धा चुकीच्या नाहीत सर्वच संप्रदायाच्या शिकवणी अमूल्य आहेत. तरीही कोणत्याच संप्रदायाला आजतागयात सर्वमान्यता मिळालेली दिसत नाही. कदाचित मिळणार सुद्धा नाही. परंतु सर्व धर्माचे जे सार आहे, संपूर्ण संप्रदायाचे जे अधिष्ठान आहे जे सत्य आहे त्याच्या प्राप्तीसाठी लागणारी किमान पात्रता तरी कोठेतरी समान असावी.

आध्यात्मिक होणे म्हणजे कोणते कर्म नसून ती एक अवस्था आहे. अशी संप्रदायाची मान्यता आहे. अध्यात्मिकता किंवा भक्त असणे म्हणजे हा एक स्वभाव आहे. कोणी चांगले म्हणावे म्हणून कोणी अध्यात्मिक होत असेल तर ती दांभिकता असते. परंतु खरा अध्यात्मिक तर रानातल्या फुलपाखरासारखा असतो. कुणी पहिले काय किंवा न पहिले काय तो आपल्या सुगंधाने वातावरण सुगंधित करणारच. तसे खरा धार्मिक लोकांत एक आणि एकट्यात एक असे वागत नाही. तर तो जो त्याचा स्वभाव असतो आणि हीच वारकरी संप्रदायाची शिकवण वारकरी संतांच्या अभंगातून दिसून येते.

**वारकरी संप्रदायाचे स्वरूप :**

भारतातील अनेक भक्तीसंप्रदायापैकी मध्ययुगात महाराष्ट्रामध्ये जे भक्ती संप्रदाय उदयास आले त्यापैकी एक प्रमुख समुदाय म्हणजे वारकरी संप्रदाय होय.वारकरी म्हणजे अखिलकोटी ब्रम्हांडनायक श्री पांडुरंग परमात्मा म्हणजे श्री विठ्ठल यांचा अनन्य भक्त, उपासक. वारकरी म्हणजे आषाढी व कार्तिकी एकादशीला पंढरीचा नियमित असा वारकरी असतो, वारकरी म्हटला म्हणजे पंढरपूरचा वारकरी. वारकरी होणे म्हणजे काय ? याचे उत्तर ह.भ.प. मामासाहेब दांडेकर अशा शब्दात द्यायचे की वारकरी होणे म्हणजे संतांनी घालून दिलेला ईशसेवामय जीवन व्यतीत करण्याचे व्रत घेणे होय. त्याचप्रमाणे आपल्या अंतशत्रूवर वार करणारा तो वारकरी. एकादशी व सोमवारचे व्रत कारणे, साकडी काकड आरती व संध्याकाळी हरिपाठ, भजन किर्तन व सतत नामसंकिर्तन अशी साधी सरळ संध्या, अत्यंत साधी वेशभूषा पांढरे कपडे, गळयात तुळशीची एकशे-आठ मण्यांची माळ, कपाळी गोपीचंदनाचा टिळा, डोक्यावर टोपी असा साधाभोळा साधक म्हणजे वारकरी. व अशा वारी करणाऱ्या भक्तांचा संप्रदाय म्हणून ओळखला जातो. वारकरी संप्रदायास माळकरी, वैष्णव, व भागवत धर्म असेही संबोधतात. पांडुरंग परमात्मा भगवान श्री विठ्ठलाची उपासना करणारा हा संप्रदाय आहे असे अभ्यासाअंती दिसून येते.

कोणीही मनुष्य मग तो कोणत्या धर्माचा आहे किंवा कोणत्या जातीचा आहे, स्त्री आहे किंवा पुरुष असा कुठलाच भेदभावाला वारकरी संप्रदायामध्ये थारा दिला जात नाही असे वारकरी संप्रदाय संतांच्या अभंग दर्शवितात. येथे कुणाची

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

जात पहिली जात नाही की धर्म पहिला जात नाही, तळागाळातील बहुजानांपासूनते छत्रपती सम्राटापर्यन्त सर्वांना सारखी वागणूक येथे दिली जाते असे वारकरी भेदभाव करतच असतात हा भाग सुद्धा वेगळा अभ्यासाचा आहे. वारकरी संप्रदायामध्ये काही विशेष प्रथा आहेत, जसे कुणी कितीही जेष्ठ किंवा ज्ञानी वारकरी असला तरी दुसरा वारकरी भेटला म्हणजे त्याला त्याच्या पाया पडाव्या लागतात मग तो वयाने, ज्ञानाने, किंवा परिस्थितीने दुबळा जरी असला तरी त्यामुळेच या संप्रदायात सर्व जाती धर्मातील संत एकाच छत्रछायेखाली आलेले दिसतात. ही या संप्रदायाची विशेषता आहे. भक्ती सोबतच सामाजिक नियंत्रण व समाजप्रबोधन करून अंधश्रद्धांचा बिमोड करत समाजात विज्ञान व अध्यात्माचा समन्वय साधणारा हा संप्रदाय आहे. या संप्रदायाचे कुळदैवत असणारा पांडुरंग परमात्मा सुद्धा एक महासमन्वयकच म्हणावा लागेल, कारण वारकरी संप्रदायाच्या आधीचे, परमात्म प्राप्तीची ईच्छा असणारे साधक आणि इतर मार्गाने दुसऱ्या साधकांच्या सहाय्याने किंवा इतर साधना करणारे प्रसिद्ध साधक सुद्धा आपल्या आदर्श दैवातासह त्याच्या भाक्तीसह या संप्रदायाशी एकरूप झालेले दिसतात. त्याचे करण म्हणजे वारकरी संप्रदाय कोणत्याच देवतांचा विरोध करत नाही. मग कोणी रामाची पूजा करो कि कृष्णाची, हरी ची पूजा करो की हराची, संप्रदायाचा याला मुळीच विरोध नाही. तसेच इतर कोणत्याच संप्रदायातील साधकाने वारकरी व्हायचे ठरविले तर संप्रदायाचा त्याला मुळीच विरोध नाही. केवळ या एकच कारणामुळे वारकरी संप्रदाय हा नाथ संप्रदाय, दत्त संप्रदाय व शैव संप्रदाय अश्या वेगवेगळ्या संप्रदायांचा सर्वसमावेशक संप्रदाय म्हणून उदयास आला.

**वारकरी संप्रदायाचे व्याप्ती :**

वारकरी संप्रदायाची व्यापकता एवढी आहे कि वारकरी सांप्रदायिक संतांच्या ओव्या इतर धर्मांनी देखील त्यांच्या धार्मिक ग्रंथात सामील केलेल्या आढळतात. मराठी माणसाच्या मनात जितका आदर या वारकरी संप्रदायाबद्दल असेल कदाचित दुसऱ्या कोणत्या संप्रदायाबद्दल नसेल. त्याचे कारण म्हणजे या संप्रदायाची शिकवण, समाजपोषक वागणूक, असामाजिक तत्वांचा त्याग व त्याच बरोबर राष्ट्रीय एकात्मता व विश्वशांतीसाठी असणारी प्रयत्नशीलता. या सर्व कारणांमुळे आजही अगदी साधारण शेतकरी मनुष्यापासून ते थेट महाविद्यालयातील प्राचार्य किंवा न्यायाधीशांसारख्या प्रशिक्षित मंडळीना सुद्धा या संप्रदायाने अगदी वेड लावलेले दिसते.

विशेष म्हणजे महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील कान्याकोपऱ्यापर्यंत पोहोचलेले व शतकानुशतके कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता भाक्तीपंथाच्या प्रवाहाचे सातत्य राखत समाजाच्या अंतर्मनात घर करून असलेला असा हा वारकरी संप्रदाय आधुनिक काळात सुद्धा आपले अस्तित्व राखून आहे. वारकरी संप्रदाय संतांचे अभंग केवळ महाराष्ट्रच नव्हे तर कर्नाटक व पंजाब मध्ये सुद्धा प्रचलित दिसतात. वारकरी संत नामदेव महाराजांचे अभंग तर शीख धर्माच्या धर्मग्रंथामध्ये सुद्धा समाविष्ठ केलेले दिसतात. असा हा वारकरी संप्रदाय महाराष्ट्रासोबतच पंजाब, कर्नाटक व इतर राज्यात सुद्धा काही प्रमाणात आढळतो.

**वारकरी संप्रदायाचा इतिहास :**

वारकरी संप्रदाय हा मध्ययुगात उदयास आला आहे असे काही अभ्यासकांचे मत असले तरी नेमका वारकरी

संप्रदायाचा उगम केव्हा झाला याचा लिखित पुरावा मात्र सापडलेला नाही.वारकरी संप्रदायाचे अभ्यासक भा. प. बहिरट व यांनी आपल्या लिखाणात याबद्दल सविस्तर माहिती दिलेली आहे. संत श्री ज्ञानेश्वर महाराजांपासून या संप्रदायाचे लिखित ।साहित्य उपलब्ध आहे. परंतु याचा अर्थ संत श्री ज्ञानदेवांच्या आधी हा संप्रदाय नव्हता असे नाही. संत ज्ञानेश्वर-संत नामदेव यांचा काळ म्हणजे बारावे शतक ज्ञानेश्वरांचा जन्म शके 1197 तर संत नामदेव महाराज हे माउलीपेक्षा वयस्क होते कारण त्याचा जन्म शके 1192. यातही वेगवेगळया अभ्यासकांच्या मतांमध्ये भिन्नता आढळते. संत ज्ञानेश्वर महाराज-संत नामदेव महाराजांचा काळ म्हणजे वारकरी संप्रदायाच्या तात्विक बैठकीचा काळ होय. परंतु याचा अर्थ वारकरी संप्रदायाचा उगम या काळात झाला असे होत नाही. कारण संत ज्ञानेश्वर महाराजांचे पूर्वज सुद्धा वारकरी असल्याचा पुरावा संत नामदेव महाराजांच्या लिखाणात सापडते. नामदेव महाराज सांगतात कि माउलींचे आई वडील विठ्ठलपंत व मत रुख्मिणी यांचा विवाह झाल्यावर शिडोपंतानी त्यांना आपली कुलदैवताच्या पाया पडण्यासाठी पंढरपूर येथे पाठविले जिथे खुप मोठी यात्रा असायची. संत नामदेव महाराज अभंगातून त्या यात्रेचे वर्णन आपल्या शब्दात करतात.

*ऐसा नित्यानित्य चालतां सुपंथी । पदोपदी कीर्ती नामघोष ॥ 1 ॥....*
*कुलदेवस्मरण  म्हणती सावधान । उभयतांचे मन पांडुरंगी ॥ 22॥*
*झाले पाणीग्रहण विधीसी अर्पण । वंदिले चरण शिडोपंती   ॥ 23॥*
*पंढरीचे क्षेत्रा माळालिसे यात्रा । आले पंढरपुरा भात्कीराज ॥ 24॥*
*गरुडटके पताका मृदंग वाजती  । वैष्णव गर्जती जयजयकारें ॥ 25॥*
*गरुडपारी उभे दाटी वैष्णवांची । उपमा वैकुंठीची पंढरीये   ॥ 26॥*
*राउळा भीतरी प्रवेशीला दोघे । देखियले उभे पांडुरंग   ॥ 27॥*
*काया वाचा मनी पारुषले  नयनी । मस्तक चरणी ठेवियेला  ॥ 28॥*
*विठ्ठलासी ध्यान रामकृष्णमाळा। हृदयी जिव्हाळा श्रीमूर्तीराया   ॥ 29॥*
*ना. म. 889*

यावरून पंढरपूर हे माउली ज्ञानदेवाच्या जन्माआधी सुद्धा प्रसिद्ध देवस्थान होते असे सिद्ध होते. कारण माउलींच्या वडिलांचे नाव देखील विठ्ठलपंत होते. आणि एखाद्या नावाला प्रसिद्ध वव्हायला त्या काळात वेळ हा लागणारच हे सांगायला नको. याही पलीकडे जावून संत नामदेव महाराज श्री पांडुरंगाच्या आरती मध्ये सांगतात. पंढरपुरातील दैवत श्रीविठ्ठल हे अठ्ठावीस युगांपासून तेथे उभे आहेत.

वारकरी संप्रदायाच्या अभ्यासावरून असे दिसून येते कि, वारकरी संप्रदायाची संपूर्ण कास नामचिंतनाची आहे. नामसाधना वारकरी संप्रदायाचा प्राण आहे. सत्याच्या शोधार्थ लागणाऱ्या पात्रतांची हा संप्रदाय जोपासना करतांना दिसतो. कोणताही अहंकार न बाळगता एकमेकांना भेटल्यावर एकमेका पाया पडणे म्हणजे नम्रतेचे उत्कृष्ठ उदाहरण होय. ज्ञान, वय, परिस्थिती किंवा प्रतिष्ठा कोणत्याचा बडेजाव न माजवता सरळ एकमेकांच्या पाया पडणे  ही निरंहकारीता आहे. परमात्म निर्मित या सृष्टीवर अगदी मनापासून प्रेम करायला संप्रदाय शिकवतांना दिसतो. कारण परमात्म्याने निर्मिलेली

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

ही सृष्टी व्यर्थ कशी असणार ? त्यातला त्यात मनुष्यप्राणी निर्मितीसाठी तर सृष्टीने आपला प्राण ओतलेला आहे. मग मनुष्य निर्मिती व्यर्थ कशी असणार ? काम, क्रोध, लोभ, मद, मोह, अहंकार, राग, द्वेष , असूया यासारख्या दुष्प्रव्रत्तींचा नाश करण्याचा संप्रदायाचा अट्टाहास दिसतो.

वारकरी संप्रदायाचे सिद्धांत हे भक्तीपुढे मोक्षास सुद्धा तुच्छ मानतात. वारकरी संप्रदाय मोक्षप्राप्ती हेच जीवनाचे अंतिम ध्येय मानतो व त्या मोक्षप्राप्तीचे मार्ग तो सांगतो. धर्ममार्ग, ज्ञानमार्ग, कर्ममार्ग व भक्तिमार्ग. वारकरी संप्रदाय हा धर्मनिरपेक्ष संप्रदाय आहे. धर्मनिरपेक्ष म्हणजे वारकरी संप्रदाय कोणत्याच धर्माचा विरोध करत नाही. संप्रदायात तर वेगवेगळ्या जाती व धर्माचे संत एकच छत्रछायेखाली भाक्तीप्रचार करतांना आजही दिसतात . धर्म किंवा जात जर मनुष्याला जन्मानेच चिटकलेले असतात परंतु मानवाच्या सामाजिक व वैयक्तिक जीवनात निर्माण होणारे प्रश्न सोडवितांना तथाकथित जन्मानिहाय धर्माचा आधार घ्यायला नको. उदा. दुष्काळ किंवा नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी योग्य तो उपाययोजना केली पाहीजे त्यासाठी कुठल्यातरी देव देवतांची पूजा करून चालणार नाही. वारकरी संप्रदाय हा कोणत्याच प्रकारच्या तंत्र-मंत्र किंवा चमत्कारावर विश्वास ठेवत नाही. धर्मनिरपेक्ष व्यक्तीधार्माचे अस्तित्व वैयक्तिक पातळीवर वारकरी संप्रदाय मानतांना दिसतो.

**निष्कर्ष : -**

तसे पाहता या संपूर्ण सृष्टीमध्ये कोणीही मोठा नाही किंवा लहान नाही प्रत्येकाचे आपापले महत्व आहे उपयोगिता आहे. कारण अशी या सृष्टीमध्ये सूर्य, चंद्र किंवा समुद्राची गरज आहे किंवा वाघ सिंह व हत्तीची गरज आहे तशीच चिमणी व मुंगीची सुद्धा आहे. अन्यथा त्यांच्या सृजनशक्तीच्या निर्मितीचे कष्ट या शक्तीने घेतलेच नसते. आणि म्हणून अस्तित्वामध्ये कोणीही मोठा नाही किंवा लहान नसतो. झोपलेला राजा काय किंवा भिकारी काय दोघांची सत्ता सारखीच असते. व जे तत्व एका पाण्याच्या थेंबात आहे तेच समुद्रात सुद्धा किंवा जे अणु एका दगडात आहेत तेच हिमालयाच्या गाभाऱ्यात सुद्धा. मग मनुष्य तरी हीन कसा असेल ? मनुष्य त्या शक्तीचाच अंश आहे हे खरे असेल तरीही जर या विश्वात कोणत्याही गोष्टीची प्राप्ती करून घ्यायची असेल तर त्या ध्येया सोबत आत्मैक साधावे लागते. मग ती कोणतीही गोष्ट असो. अगदी परमात्मा सुद्धा आणि म्हणून त्या परमात्म प्राप्तीचे सर्वोच्च साधन कोणते असेल तर त्या परमात्म्याचे सतत चिंतन आणि तिच साधना वारकरी संप्रदाय जगाला शिकवितांना दिसतो.

**संदर्भ -:**

भा. प. बहिरट , प.ज्ञा. भालेराव, वारकरी संप्रदाय उदय व विकास 1988, व्हीनस प्रकाशन पुणे.

डॉ. सदानंद मोरे, तुकाराम दर्शन 1996, गाज प्रकाशन पुणे.

म.बा.कुंडले, शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र 2003, श्रीविद्या प्रकाशन पुणे.

डॉ. गोपाळराव गोविंद बेणारे, सार्थ श्रीतुकारामाची गाथा, शारदा साहित्य पुणे.

श्रीबाबाजीमहाराज पंडित यांनी विवरण केलेली श्रीज्ञानेश्वरी-गुढार्थदीपिका, गीताप्रेस गोरखपूर.

डॉ. नरेंद्र दाभोळकर तिमिरातुनी तेजाकडे 2013, राजहंस प्रकाशन पुणे.

आचार्य रजनीश (ओशो), गीता दर्शन, ताओ पब्लिशिंग प्रा. लि. कोरेगाव पार्क पुणे.

डॉ. गोपाळराव गोविंद बेणारे, सार्थ श्रीतुकारामाची गाथा, शारदा साहित्य पुणे.

गीताप्रेस गोरखपूर, नामदेवांची गाथा.

स्वामी रामसुखादास, श्रीमद्भागवदगीता साधक – संजीवनी, गीताप्रेस गोरखपूर.